**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 08/10/2025

**आरोपी लोकसेवक** - संतोष वसंत राऊत, पोलिस उप निरीक्षक (वर्ग 2) नेमणूक मुकुंदवाडी पोलिस ठाणे, छत्रपती संभाजी नगर शहरयांनी तक्रारदार यांच्या कडुन 8,000/- (आठ हजार रुपये) लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर (शहर) येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्री संतोष वसंत राऊत, वय 43 वर्ष, पद पोलिस उप निरीक्षक (वर्ग 2) नेमणूक मुकुंदवाडी पोलिस ठाणे, छत्रपती संभाजी नगर शहर, रा. रो हाऊस क्रमांक 8 मोर्या पार्क 2, हर्सूल, छत्रपती संभाजी नगर |
| लाच मागणी रक्कम | 10,000/- (दहा हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 8,000/- (आठ हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>सहा.सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. योगेश शिंदे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री वाल्मिक कोरे, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. संतोष तिगोटे, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | यातील तक्रार दार यांच्या भावाच्या विरोधात मुकुंदवाडी पोलिस स्टेशन छत्रपती संभाजी नगर शहर येथे शस्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद असून त्यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास आलोसे यांच्या कडे असून तक्रारदार यांनी आलोसे यांना त्यांच्या भावाच्या विरोधात दाखल गुन्ह्यात मदत करण्याची विनंती केली. सदर वेळी आलोसे यांनी तक्रारदार यांच्या कडे दाखल गुन्ह्यात मदत करण्यासाठी 10 हजार रुपयांची लाच मागणी केली. तक्रारदारास लाच रक्कम द्यायची नसल्याने त्यांनी दिनांक 07/10/2025 रोजी ला प्र वि कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार नोंदवली. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 07/10/2025 रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी कार्यवाही आजमावली असता, आलोसे यांनी तक्रारदारा कडे दाखल गुन्ह्यात मदत करण्यासाठी 10 हजार रुपयांची लाच मागणी करून तडजोडी अंती 8 हजार रुपये स्वीकारण्याचे कबूल केले.<br>आलोसे यांच्या लाच मागणी नंतर दिनांक 07/10/2028 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई दरम्यान मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात आलोसे यांनी स्वतः तक्रारदार यांच्या कडून 8 हजार लाच रक्कम स्वीकारली. आलोसे यांनी लाच रक्कम स्वीकारल्या नंतर पंच समक्ष त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्यात आली असुन आलोसे यांच्या विरुध्द पोलीस ठाणे मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केलेली आहे. |

**सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक, श्री.सुरेश नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री योगेश शिंदे, सहा.सापळा अधिकारी. पोलीस निरिक्षक श्री वाल्मिक कोरे यांनी केली असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरिक्षक श्री.संतोष तिगोटे करीत आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ राजेंद्र सिनकर, पोअ/ प्रकाश डोंगरदीवे, चालक पोअ/ सी. एन बागुल ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.**


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064


(शिक्का: पोलीस उप अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर — सत्यमेव जयते)

सुरेश नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर
8/10/2025